# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १६६ वा शनिवार दि.१४ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# ध्वजदिन निधीतून सैनिकांविषयीचे ऋण व्यक्त करण्याची संधी-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

## सैनिकांविषयी प्रत्येक भारतीयाच्या मनात आदराची भावना

लातूर :- ऊन, वारा, पावसाचा विचार न करता आपल्या भारत भूमीच्या रक्षणार्थ सीमेवर उभ्या असलेल्या प्रत्येक सैनिकाप्रती भारतीयांच्या मनात आदराची भावना आहे. त्यांच्यामुळेच आपण सुरक्षित आहोत, याची जाणीव सर्वांना आहे. आपल्या सैनिकांविषयी ऋण व्यक्त करण्याची संधी ध्वजदिन निधी संकलनाच्यामाध्यमातून प्रत्येक नागरिकाला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांनी ध्वजदिन निधीमध्ये आपले योगदान देवून जिल्ह्यात जास्तीत जास्त ध्वजदिन निधी संकलित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक बोर्डाच्या अध्यक्ष श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीमध्ये सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास प्रारंभ झाला. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, पोलीस उपाधीक्षक गजानन भातलवंडे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी शरद प्रकाश पांढरे (निवृत्त), सेना पदक प्राप्त कर्नल गिरिधर कोले (निवृत्त), मेजर व्ही. व्ही. पटवारी (निवृत्त), ले. कर्नल बी. आर. हरणे (निवृत्त), कॅप्टन कृष्णा गिरी (निवृत्त), ईसीएचएसचे प्रभारी अधिकारी कर्नल प्रकाश राजकर (निवृत्त), माजी सैनिक सय्यद सब्बीर यांच्यासह माजी सैनिक संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांच्यासह माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय यांच्या समवेत आज होत असलेल्या कार्यक्रमाला कौटुंबिक स्वरूप प्राप्त झाले आहे. वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांचा सन्मान, माजी सैनिकांच्या पाल्यांनी विविध क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल होणारा सत्कार हा या कार्यक्रमातील अतिशय महत्वपूर्ण क्षण असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी नमूद केले. तसेच माजी सैनिक पाल्यांच्या शिक्षणासाठी, त्यांना करिअरबाबत योग्य मार्गदर्शन व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत पुढाकार घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. वीरपत्नी, वीरमाता, माजी सैनिकांच्या पत्नी यांच्यासाठी बचत गटांच्या माध्यमातून उत्पन्नाची संधी निर्माण करून देण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयामध्ये सैनिक, माजी सैनिक यांच्या समस्या सोडविणे, त्यांना विविध शासकीय सेवा पुरविण्यासाठी प्राधान्य देण्याच्या सूचना संबंधितांना देणार असल्याचे त्यांनी सांगितले. गतवर्षी ध्वजदिन निधी संकलनात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे







राज्यपाल महोदय यांच्या हस्ते जिल्हा प्रशासनाचा सन्मान झाला. प्रशासनातील सर्व घटकांच्या योगदानामुळे जिल्ह्याचा गौरव झाला. हा पुरस्कार प्रेरणादायी असून या पुरस्कारामुळे जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आणखी वाढली आहे. त्यानुसार यापुढेही जिल्हा प्रशासन सैनिक, माजी सैनिक यांच्यासाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेईल, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी नमूद केले.

ध्वजदिन निधीचा उपयोग हा सैनिक, माजी सैनिकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी होतो. गतवर्षी लातूर जिल्ह्याला जवळपास ४२ लाख रुपयांचे उद्दिष्ट असताना सुमारे १ कोटी १६ लाख रुपये निधी संकलित झाला होता. यंदा ४८ लाख रुपये निधी संकलनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून जिह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी ध्वजदिन निधीमध्ये सढळ हाताने योगदान देण्याचे आवाहन जिल्हा सैनिक अधिकारी ले. कर्नल श्री. पांढरे यांनी प्रास्ताविकात केले. तसेच जिल्हा सैनिक कार्यालयामार्फत सैनिक, माजी सैनिक यांच्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते ध्वजदिन निधी संकलनाला सुरुवात करण्यात आली. तसेच यावेळी उपस्थित वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विशेष कामगिरी करणारे माजी सैनिक, माजी सैनिकांचे पाल्य यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. गतवर्षीच्या ध्वजदिन निधी संकलनात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या शासकीय विभागांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. प्रारंभी स्वर रागिणी म्युझिकल ग्रुपने देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे यांनी केले, जिल्हा सैनिक कार्यालयातील वरिष्ठ लिपिक एस. व्ही. घोंगडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# गडनदी होणार गाळमुक्त ;माखजन येथे उपशाला प्रारंभ.

माखजन/ प्रतिनिधी:- संगमेश्वर तालुक्यातील माखजन येथील गडनदी पात्रातील गाळ उपशाला प्रारंभ झाला आहे. माखजन बाजारपेठेत वारंवार भरणाऱ्या पुराच्या पाण्याने व्यापारी व रहिवासी प्रचंड त्रस्त झाले होते.गडनदी पात्रातील व बाजूला ओढ्यांमधील गाळ काढण्यात यावा,अशी गेली अनेक वर्षांपासून व्यापारी तसेच ग्रामस्थांकडून मागणी होत होती. या मागणीची दखल घेत आमदार शेखर निकम यांनी जिल्हा वार्षिक नियोजनमधुन इंधनासाठी १३ लाख रूपये मंजूर करून आणले शिवाय गडनदीच्या बाजुला बाजाराकडे असलेल्या ओढ्याला संरक्षक भिंतीसाठी पतन योजनेतून १ कोटी रूपये एवढा निधी मंजूर करून घेतला आहे. याबद्दल आमदार शेखर निकम यांचे आभार मानले जात आहे.तसेच उपस्थित व्यापारी महेश बाष्टे ( सरपंच), रूपेश गोताड, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष,अजिज आलेकर, जयंत धामणकर, शकील म्हाते,श्रीकांत वर्तक,गजानन पवार, राकेश बाष्टे,शैलेश चव्हाण, रोहित रजपूत, संतोष सावर्डेकर,बावा अली, प्रथमेश कवळकर, इकलाख खोत, विनय धामणकर, प्रफुल्ल कोकाटे, प्रमोद चव्हाण, सुर्यकांत कोकाटे,आसिफ खोत व जलसंपदा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. सध्या माखजन बाजारपेठेनजीक गडनदी पात्रात गाळ काढणाच्या कामाला गती आली आहे. याठिकाणी जलसंपदा विभागातील मशिनरी कार्यरत आहे.गडनदीचा गाळ उसपत असल्याने बाजारपेठेत वारंवार भरणाऱ्या पाण्याचा फटका भविष्यात कमी बसण्याची शक्यता आहे. गाळ उपशाची कारवाई तत्काळ झाल्याने समाधान व्यक्त होत आहे.



# निलंगा तालूक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी नुकसान भरपाई पोटी मिळणार ५१ कोटी ६८ लाख आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या पाठपुराव्यास यश

निलंगा / प्रतिनिधी : निसर्गाच्या लहरीपणामुळे यावर्षी निलंगा तालुक्यासह लातूर जिल्हयात विविध ठिकाणी अतिवृष्टी झाली होती. यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन त्यांना आर्थिक फटका बसला होता, त्यामुळेच आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी निलंगा विधानसभा मतदार संघासह जिल्हयातील ज्या शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले त्यांना शासनाने मदत करावी अशी मागणी करुन त्यासाठी पाठपुरावा केला होता. यापाठपुराव्यामुळे जिल्हयातील बाधीत शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाई प्राप्त झाली, मात्र निलंगा तालुक्यातील काही शेतकरी यापासुन वंचीत राहिले होते. याबाबत ही आ. निलंगेकर यांनी शासन दरबारी पाठपुरावा केल्याने त्यांना आता नुकसान भरपाई पोटी ५१ कोटी ६८ लाख रुपये मदत मिळणार आहे. लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर हे अनुदान जमा होणार आहे. लातूर जिल्हयात यावर्षी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती. तसेच काही भागामध्ये ढगफुटी सदृष्य पाऊस पडला होता. परिनामी अनेक भागामध्ये पुर परिस्थिती निर्माण झाली होती, त्याच बरोबर तेरणा व मांजरा नदी पात्रात धरण क्षेत्रातून सोडण्यात आलेल्या अतिरिक्त पाण्यामुळे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही शेतकऱ्यांच्या जमीनी देखील खरडून गेल्या होत्या. या परिस्थितीने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला होता. यामुळे या शेतकऱ्यांना शासनाकडून मदत व्हावी यासाठी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी शासनाकडे मागणी करुन यासाठी पाठपुरावा केला होता. आ. निलंगेकर यांच्या मागणीची दखल घेत शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहिर करुन त्यासाठी निधी हि उपलब्ध करुन दिला होता. मात्र या मदती पासुन निलंगा तालुक्यातील शेतकरी वंचीत राहिले होते. निलंगा तालुक्यातील जवळपास ३८ हजार हेकटर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झालेले होते. या सर्व शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा यासाठी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी पुनश्च एकदा शासन दरबारी प्रयत्न केलेले होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळाले आहे. निलंगा तालुक्यातील त्या शेतकऱ्यांना आता शासनाची आर्थिक मदत प्राप्त होणार आहे. याकरीता शासनाकडून ५१ कोटी ६८ लाखाचा निधी प्राप्त झालेला असुन लवकरच हि रक्कम बाधीत शेतकऱ्यांना वितरीत करण्यात येणार आहे. सदर निधी प्राप्त झाल्या बद्दल आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्यासह शासनाचे शेतकऱ्यांच्या वतीने आभार मानुन समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



# लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे ईव्हीएम विरोधात ईव्हीएम हटाओ लोकशाही बचाओ स्वाक्षरी अभियान

लातूर / प्रतिनिधी :- राज्यातील महायुतीचे सरकार जनमताने सत्तेवर आलेले नाही यामुळे ईव्हीएम बाबत सर्वस्तरातून वेगवेगळया मतदान केंद्रावर शंका व्यक्त होत आहेत.या सर्व शंकाचे निरसन निवडणूक आयोगाने करणे गरजेचे आहे परंतु ते केले जात नाही.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले,माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर रोजी सकाळी लातुर शहरातील बार्शी रोडवरील संविधान चौक येथे ईव्हीएम विरोधात ईव्हीएम हटाओ लोकशाही बचाओ स्वाक्षरी अभियान करण्यात आले. यावेळी माजी महापौर ड. दिपक सूळ, विलास बँकेचे व्हाईस चेअरमन ड.समद पटेल, महिला काँग्रेस अध्यक्ष प्रा.डॉ.स्मिता खानापुरे, युवक काँग्रेस अध्यक्ष इम्रान सय्यद, अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे, सोशल मीडिया अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, जिल्हा बँकेचे संचालक पृथ्वीराज शिरसाठ, दगडू मिटकरी,राजकुमार जाधव, कैलास कांबळे, डॉ.बालाजी सोळुंके, दत्ता सोमवंशी,नागसेन कामेगावकर,मुन्ना शिंदे, विजय गायकवाड, संजय ओहोळ, बिभिषण सांगवीकर, धनंजय शेळके, गणपत राठोड,ड. गणेश कांबळे, भालचंद्र सोनकांबळे,राजू गवळी, काशिनाथ वाघमारे, पिराजी साठे, किरण बनसोडे, हरीश वाघमारे, प्रा. शिवशरण हावळे, श्रीनाथ माने, ड. कल्पना मोरे, शीलाताई वाघमारे,लहू वाघमारे. अनिता रसाळ, मंदाकिनी शिखरे,सुकेशनी गोडबोले शोभाताई ओव्हाळ मीनाताई टेंकाळे, सुमन चव्हाण, पवन गायकवाड,सोमेन वाघमारे,विष्णू धायगुडे,अभिषेक पतंगे, रामकिशन शिंदे, लतेश आवटे, सुनील कांबळे , आशुतोष मुळे, राम स्वामी, जालिंदर बर्डे, बब्रुवान गायकवाड, श्रीकांत गर्जे, राजे निंबाळकर, मिलिंद घनगावे,सचिन कराळे, नागेश जोगदंड, चंद्रकांत साळुंके, हुसेन भाई,नाईकवाडे, विक्की सरकार, किरण जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.






# एसटी कर्मचा-यांना रजा देण्याच्या पद्धतीत स्पष्टता आणण्याची गरज

मुंबई : प्रतिनिधी एसटी महामंडळात चालक, वाहक व यांत्रिकी कर्मचा-यांच्या रजा मंजूर करण्यात पक्षपातीपणा केला जातो. रजे बाबतीत कुठलीही स्पष्टता, नियम व निकष नसल्यामुळे राज्यातील महत्वाच्या ५० शासकीय उपक्रमांचा विचार केला. तर कर्मचा-यांच्या गैरहजेरीमध्ये एसटी महामंडळातील कर्मचा-यांचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. रजेबाबतीत अधिकारी व पर्यवेक्षक हे मनमानी करीत आहेत, त्यामुळे रजा देण्याच्या पद्धतीत तत्काळ स्पष्टता आणली पाहिजे, असे मत महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केले आहे.

राज्यातील अनेक शासकीय महामंडळे व उपक्रम यांच्या कर्मचा-यांना रजा देण्याच्या पद्धतीत व एसटी महामंडळातील कर्मचा-यांना रजा देण्याच्या पद्धतीत खूप मोठा फरक आहे. इतर शासकीय उपक्रमामध्ये रजा देण्याची एक विशिष्ठ पद्धत आहे. एसटी मध्ये मात्र कर्मचारी अचानक आजारी पडल्यास किंवा अचानक काम निघाल्यास त्याला कशी रजा देता येईल. या बद्दल कुठलीही स्पष्टता, निकष किंवा नियम घालून दिलेले नाहीत.

हे विदारक चित्र असून नेहमी अत्यावश्यक सेवा असल्याचे कारण देत रजा नाकारली जाते. परिणामी अचानक काही काम निघाल्यास किंवा आजारी पडल्यास नाईलाजास्तव कर्मचारी कामावर येऊ शकत नाही. अशा वेळी त्यांच्या खात्यावर २०० ते ३०० दिवस रजा शिल्लक असताना सुद्धा त्यांची गैरहजेरी लिहिली जाते. हे वास्तव असून रजा देण्याच्या पद्धतीत स्पष्टता आणली पाहिजे.

## संपादकीय....

# सल्ला स्वीकारावा

बांगलादेशातील अल्पसंख्याकांवर म्हणजे हिंदू, ख्रिश्चन वगैरेंवर होणारे अत्याचार गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहेत. प्रामुख्याने हिंदूंवरील अत्याचाराचा मुद्दा विशेष गंभीर आहे. बांगलादेशातील हिंदूही बांगलादेशचेच नागरिक आहेत. त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारीही तेथील अंतरिम सरकारवर येते. दुर्दैव असे आहे की ही बाब गांभीर्याने घेण्याऐवजी ते याकडे बेफिकिरीने पाहात आहेत आणि भारतालाच प्रलंबित समस्या सोडण्याचा सल्ला देऊ पाहात आहेत.

बांगलादेशमध्ये शेख हसीना यांना अपमानास्पद प्रकारे सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. चार महिन्यांपासून अंतरिम सरकार तेथे काम पाहते आहे. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी दोनच दिवसांपूर्वी बांगलादेशचा दौरा केला. मात्र, डोळ्यावर पट्टी बांधलेल्या बांगलादेशच्या बेजबाबदारपणामुळे या दौर्यात काहीही हाती लागले नाही. भारताची चिंता होती ती हिंदूंच्या सुरक्षेची. तो विषय अनिर्णितच राहिला. बांगलादेशातून पलायन केल्यानंतर शेख हसीना यांना भारताने आश्रय दिला हे दोन्ही देशांतील संबंधांत कटुता येण्याचे कारण. त्यात बांगलादेश आता अशा थराला गेला की त्यांना त्यांचा इतिहासही विस्मरणात गेला आहे. त्यांचे अस्तित्वच ज्या देशामुळे निर्माण झाले त्या भारतालाच आमच्या अंतर्गत बाबींत कोणी दुसरा देश हस्तक्षेप करू शकत नाही असे सांगण्यापर्यंत त्यांची मजल गेली.

बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीमुद्दीन यांची प्रतिक्रिया अगदी चमत्कारिक होती. दोन्ही देशांत विश्वास कायम करण्यासाठी भारतात बांगलादेशाच्या विरोधात जे नकारात्मक वातावरण तयार केले जाते आहे ते रोखण्यासाठी भारताने सक्रिय सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आमच्या देशात सर्व धर्मांचे नागरिक स्वतंत्रपणे आपापली धार्मिक कर्तव्ये पार पाडत आहेत. कोणावरही कोणते बंधन अथवा दडपण नाही. बांगलादेश इतर देशांच्या अंतर्गत बाबींत टिप्पणी करत नाही व अन्य देशांकडूनही आमची हीच अपेक्षा असल्याचा शाहजोगपणा त्यांनी दाखवला. त्याहीपुढे जात भारतीय माध्यमे भ्रामक बातम्या पसरवत आहेत आणि त्यांच्याकडून चुकीच्या बाबी सांगितल्या जात असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. बांगलादेशातील नेते आणि तेथील सरकार जे म्हणते ते अगदी उथळपणाचे लक्षण आहे. त्या देशात अल्पसंख्याकांसोबत जे काही घडते आहे ते जगापासून लपून राहिलेले नाही.

अमेरिकेनेसुद्धा अल्पसंख्याकांवर आणि खासकरून हिंदूंवरून होणार्या अत्याचाराच्या घटनांचा संदर्भ देत हे प्रकार तातडीने थांबवण्याचा इशारा बांगलादेशला दिला. उपद्रव करणार्यांना रोखा, त्यांच्यावर कठोर कारवाई करा जेणेकरून अन्य समुदायांना सुरक्षित वाटेल अशी सूचना मोहम्मद युनूस यांच्या सरकारला केली गेली. मात्र युनूस यांनी वेगळीच पिपाणी वाजवली. भारतासोबतचे संबंध अगदी ठोस आणि घनिष्ठ असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तथापि, शेख हसीना भारतात बसून जी विधाने करत आहेत त्यामुळे बांगलादेशात तणाव निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला. दोन स्वतंत्र देशांच्या राजनैतिक अधिकार्यांच्या बैठका होतात तेव्हा सामान्यत: राजनैतिक आणि आर्थिक बाबींवर चर्चा होतच असतात. तशा त्या झाल्या असल्या तरी त्यात विशेष काही नाही; मिसरी यांच्या दौर्याचा मुख्य उद्देश हा होता की बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेची त्या देशातील सरकारने विशेष खबरदारी घ्यावी आणि त्याकरता त्यांना सूचित करावे हा होता. ते झालेले दिसले नाही. चूक झाली असल्यास अगोदर चूक झाल्याची मान्य करणे हे ती सुधारण्याच्या दिशेने उचललेले पहिले पाऊल असते. जर आमची चूकच नाही असा कोणाचा हेका असेल आणि त्याचे खापर अन्य बाबींवर फोडले जात असेल तर प्रश्न सामंजस्याने सोडवला जाण्याला मर्यादित वाव राहतो.

शेख हसीना आणि त्यांच्या पूर्वाश्रमीच्या राजवटीविरोधात बांगलादेशातील इतर राजकीय पक्ष आणि मोहम्मद युनूस यांच्यासारखे तज्ज्ञ आणि कथित विद्यार्थी नेते यांचा राग असू शकतो व ती त्यांची कारणे झाली. तो विषय त्यांनी कुटनीतीच्या माध्यमातून आणि बोलणी करून सोडवायला हवा. त्याकरता शेख हसीना यांना ज्या देशाने आश्रय दिला आहे त्या देशातील विशिष्ट धर्माच्या लोकांना लक्ष्य करण्याचे काही कारणच नाही. बांगलादेशात सर्वच घटकांच्या उत्थानासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार्या धार्मिक नेत्याला देशद्रोहाच्या आरोपाखाली तुरुंगात टाकून आणि त्याला वकीलही मिळणार नाही अशी तजवीज करून बांगलादेश भविष्यातील आपल्याच अडचणी वाढवत आहे. होत असलेल्या आणि झालेल्या गंभीर घटनांची जबाबदारी घेण्याऐवजी एखादा देश इतक्या बेफिकिरीने आपली जबाबदारी झटकत असेल तर ते अनावश्यक हानीला आमंत्रण देणे ठरते.

बांगलादेशात ऑगस्ट महिन्यात अचानक निर्माण झालेल्या अथवा केल्या गेलेल्या अराजकामुळे युनूस यांचे अंतरिम सरकार आले आहे. त्यांच्यापुढे मुळातच बरीच आव्हाने आहेत. अशा स्थितीत त्यांनी देशापुढे आणखी आव्हाने निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेणे महत्त्वाचे. अल्पसंख्याकांची सुरक्षा आणि एकूणच मानवाधिकारांचे रक्षण करण्यात त्यांना अपयश आले तर अराजकता गंभीर वळण घेऊ शकते. जगातील इतरही देशांमध्ये प्रदीर्घ काळ चालत आलेल्या राजवटींना उलथवून टाकण्याचे प्रकार सुरू आहेत. मात्र घराणेशाहीची जुलमी राजवट संपवून देश पुन्हा कट्टरवाद्यांच्या हातात देण्याला क्रांती किंवा परिवर्तन म्हणायचे का हा प्रश्न आहे. एक मोठी शक्ती म्हणून भारत बांगलादेशकडे आपली चिंता व्यक्त करत असेल, तर बांगलादेशने तो सल्ला म्हणून स्वीकारला पाहिजे. आपल्याच फुशारकीच्या नादात तो सल्ला अव्हेरण्याचा प्रयत्न केला तर लोकशाही, विकास, प्रगती आणि अंतर्गत सुरक्षा या सगळ्याच बाबींत तो देश मागे फेकला जाईल.

# माझ्या आठवणीतील महादेव बोरकर

हाडामासाचे शिक्षक महादेव बोरकर यांचा जन्म भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यात २५/१/१९३९ ला आसोला येथे झाला .आसोला हे गाव अतिशय लहान . अवतीभवती कुठेही औद्योगिक वसाहती किंवा कारखानदारी नसल्याने कामासाठी प्रचंड भटकंती करावी लागायची. त्यातही त्यांची दलित म्हणूनच ओळख होती . एका दलित कुटुंबातून देशाच्या त्यावेळी जन्माला आलेल्या माणसांना काय काय सहन करावं लागायचं ते त्यांच्या तोंडून ऐकल्यावर आपण काय प्रतिक्रिया द्यावी हेच कळत नाही! त्यांचे आई-वडील पडेल ते काम करायचे. महादेव बोरकर यांना शिक्षणाची खूप आवड होती. ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी बरीच मेहनत घेतली .ती परिस्थितीत बदलण्यासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे हे महादेव बोरकरांना कळून चुकलं. म्हणून काहीही झालं तरी शिक्षण घ्यायचं हा विचार त्यांनी पक्का केला. काही झालं तरी शिक्षण घ्यायचं आपलं आयुष्य शिक्षणाशिवाय बदलू शकत नाही हे कळल्यामुळेच त्यांनी आई-वडिलांना कामात मदत करून शिक्षण घेतलं .ते घेण्यासाठी त्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ही फार मोठी साथ मिळाली. महादेव बोरकर यांना भजन कीर्तनाचा भारी नाद असल्याने त्यांची तुकडोजी महाराजांशी भेट झाली .महाराजांनीही महादेव बोरकर यांची आवड लक्षात घेतली .आणि त्यांना शिक्षणासाठी मदत केली .महादेव बोरकर आणि त्यांचे कुटुंबीय तुकडोजींच्या विचारांनी प्रभावित झाले आहेत असं अनेकदा लक्षात येतं. महादेव बोरकर अशा प्रकारे सातव्या वर्गाची परीक्षा पास झालेत . त्यांना शिक्षकाची नोकरी नोकरी मिळाली . पण शिक्षक एवढ्याच साच्यात ते राहिले नाही. त्यांना भजन कीर्तनासोबतच अभिनयातही आवड होती. ते चांगले मूर्तिकारही होते .तसेच ते चांगले चित्रकारही होते ..त्यांनी निर्माण केलेल्या अनेक मूर्ती आजही आहेत. घरी प्रचंड आर्थिक अडचण सहन केल्याने त्यांना पैशाचं मोल बऱ्यापैकी कळलं.पैसा कुठे आणि कसा वापरावा, खर्च करावा हे ते नेहमी सांगत असत. संगतीचा परिणाम काय असतो हे महादेव बोरकरांकडून शिकण्यासारखं आहे. कारण ते राष्ट्रसंतांच्या सहवासात राहिले त्यामुळे राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या वागण्यात बोलण्यात आणि राहण्यात कायम जाणवला .त्यांना कुठलेही वाईट छंद, व्यसन वगैरे नव्हते .दारू वगैरे पासून ते नेहमीच अंतर राखून राहिले. तरी त्यांच्या अभिनयात जिवंत दारुड्या त्यांनी उभा केला. एकच प्याला मधील सुधाकर झाडीपट्टीतील अनेक प्रेक्षक रसिकांच्या लक्षात राहील असा महादेव बोरकर यांनी सहज आणि सुंदर अभिनयात साकार केला .त्यांच्या अनेक नाटकातील पात्र त्यांनी जिवंतपणे साकारले. ते आजरा मर केले .हे करताना त्यांनी त्यांच्या नोकरीत कोणतीही उणीव ठेवलेली नाही. ते कर्तव्यदक्ष शिक्षक होते. आपल्या कामात हयगय कोणीही करू नये कारण आपल्याला त्यासाठीच महिन्याला पगार मिळतो म्हणून प्रत्येकाने आपल्या कामाशी एकनिष्ठ राहिले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता . त्यांचा कामावर प्रगाड विश्वास होता. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्यांनी अधिक लक्ष घातलं. फक्त सांगून जे जमलं नाही ते छडी हातात घेऊनही केलं. विद्यार्थ्यांना मारलं तसंच त्यांच्यावर प्रेमही केलं. विद्यार्थ्यांना वेळी अवेळी



शैक्षणिक अडचणीत मदत केली .एक आदर्श शिक्षक म्हणून जे करायला पाहिजे ते सारं काही महादेव बोरकर यांनी केलं. त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी आर्थिक मदत केली . नागपूर येथील मधुकर मेश्राम नावाचे त्यांचे एक विद्यार्थी सांगतात की माझा बीएडला नागपूर येथे नंबर लागला तेव्हा दर महिन्याला त्यांचं एक पत्र यायचं आणि आणि पत्रातून ते अभ्यास आणि अडचणी विषय विचारायचे .खास करून आर्थिक अडचण असल्यास कळव असे महादेव बोरकर आवर्जून लिहायचे .ते म्हणतात महादेव बोरकर यांनी माझ्या शैक्षणिक काळात मोलाची मदत केली .म्हणूनच मलाही शिक्षक होता आलं .बीएड पर्यंत सतत दर महिन्याला न चुकता लाखांदूर तालुक्यातील पारडी येथून पत्र लिहिणारा आदर्श शिक्षक मी पाहिला असं ते अगदी भावनिक होऊन सांगतात .अगदीच काही महिन्यांपूर्वी त्यांनी त्यांच्या शेजारील मुलाला पैसे देऊन स्पर्धा परीक्षेला पाठविले आणि तो बँकेत मॅनेजर झाला .महादेव बोरकर एक व्यक्तीच नव्हते तर जिवंत भावाकुल माणुसकी जपणारे हाडामासाचे शिक्षक होते .दुसऱ्यांचे दुःख आपले माणून त्यातून मुक्त करण्यासाठी इतरांना सतत मदत करणारे परोपकारी व्यक्तिमत्व म्हणजे महादेव बोरकर. स्वतः भोगलेल्या अतिशय प्रतिकूल परिस्थितीची त्यांना अखेरपर्यंत जाणीव होती.म्हणूनच सतत दुसऱ्यांची विचारपूस करणे, त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणे, त्यांना चांगलं जमलं. बाबासाहेबांचा विचार ते नेहमीच सांगत असत, की स्वतःची परिस्थिती बदलायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यांनी शिक्षणात मोलाची प्रगती केली. त्यांचं संपूर्ण कुटुंब आज नोकरीत रमलंय. पण प्रत्येकाने माणुसकी सांभाळली आहे. हे महादेव बोरकर यांच्या संस्कारातून मिळालं आहे. आज कुटुंबात चांगले संस्कार रुजले आहेत. पण हे विचार देणारा माणूस मात्र हरवला आहे. ११ / ९/२०२४ ला त्यांचं वृद्धापकाळाने निधन झालं. त्यांच्या अंत्ययात्रेत अथांग जन सागर उसळला तो जनसागर म्हणजे त्यांनी कमावलेली माणसं होती तीच त्यांच्या त्यांची संपत्ती होती..... त्यांना विनम्र अभिवादन...

*******

राजू बोरकर
मु.पो.ता. लाखांदूर
जिल्हा भंडारा
७५०७०२५४६७

# भारताची 'अणु'शक्ती.

जगात युद्धसदृश परिस्थिती दिसते. त्यामुळे भारताकडे ९० ते ११० अणुबॉम्ब असावेत, जे सध्या पुरेसे आहेत. मात्र, आपल्याकडे जी क्षेपणास्त्रे आहेत त्यांच्या मदतीने आपण युद्ध करण्याकरिता पूर्णपणे सक्षम आहोत का?

अणुयुद्ध लढण्याकरिता आण्विक ट्रायड/आण्विक त्रिसूत्री ही एक लष्करी संकल्पना आहे, ज्यामध्ये तीन भाग असतात. आंतरखंडीय क्षेपणास्त्रे म्हणजे जमिनीवर आधारित आण्विक क्षेपणास्त्रे, आकाशातून हल्ला करणारी स्ट्रॅटेजिक बॉम्बर्स म्हणजे अणुबॉम्ब आणि क्षेपणास्त्र असलेले विमान आणि पाणबुडी-प्रक्षेपित बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, आण्विक-क्षेपणास्त्र-सशस्त्र पाणबुड्या. ही क्षमता आता भारताकडेही आहे. भारतीय नौदलात अलीकडेच समाविष्ट झालेल्या आयएनएस अरिघात या पाणबुडीतून अण्वस्त्रक्षम साडेतीन हजार किमी पल्ल्याच्या के-४ बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी करण्यात आली. या चाचणीने चीनच्या मुख्य भूभागातील बराचसा भाग प्रहार टप्प्यात येईल. यातून भारताची आण्विक ट्रायड अधिक बळकट झाली आहे. आण्विक युद्धात प्रतिहल्ला



चढविण्यासाठी अजून एक प्रभावी पर्याय उपलब्ध झाला आहे.

भारताची अणुशक्तीवर चालणारी आयएनएस अरिघात ही दुसरी बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडी (एसएसबीएन) आहे. तीन महिन्यांपूर्वीच ती नौदलात सामील झाली. या पाणबुडीतून २७ नोव्हेंबर रोजी भारतीय नौदलाने अण्वस्त्रक्षम साडेतीन हजार किमी मारक क्षमतेचे के-४ क्षेपणास्त्र डागण्याची चाचणी केली. पाण्याखालील क्षेपणास्त्र प्रक्षेपक प्रणाली हे अत्यंत कठीण काम आहे. पाणबुडीतून डागलेल्या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण क्षमता सिद्ध करण्यासाठीची चाचणी हे महत्त्वाचे पाऊल आहे. यात शस्त्रप्रणालीचे परिचालन व तांत्रिक मापदंड सिद्ध केले जातात.

के-४ क्षेपणास्त्र काय आहे? नौदलाच्या अरिहंत वर्गातील पाणबुड्यांसाठी संरक्षण संशोधन व विकास संस्थेने (डीआरडीओ) विकसित केलेले के-४ हे साडेतीन हजार किमी पल्ल्याचे क्षेपणास्त्र जे स्वदेशी क्षेपणास्त्रांच्या के मालिकेतले आहे. माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या सन्मानार्थ त्यांच्या 'के' आद्याक्षरावरून त्याचे नामकरण करण्यात आले आहे. विकसित क्षेपणास्त्राची २०१४ आणि २०१६ मध्ये यशस्वी चाचणी घेण्यात आली होती व आण्विक शस्त्रे वाहून नेण्याची क्षमता प्रमाणित करण्यात आली. घन रॉकेट प्रणोदकावर ते आधारित आहे. या क्षेपणास्त्रात तीन घटकांना परस्परांना जोडणारी प्रणाली आहे, ज्यामुळे शत्रूला बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीतून के-४ क्षेपणास्त्राचा माग काढणे आणि त्यास नष्ट करणे कठीण होईल.

अनेक तांत्रिक अडथळे पार करून के मालिकेतील या क्षेपणास्त्रांचा विकास करण्यात आला. पाणबुडीतून अण्वस्त्र डागण्याची क्षमता भारताच्या सामर्थ्यात सामरिक जोड देणारी ठरेल. या वर्गातील तिसरी आयएनएस अरिदमन ही पाणबुडी पुढील वर्षात कार्यान्वित होईल. त्यानंतर अणुशक्तीवरील दोन पाणबुड्या के-५ या पाच हजार किलोमीटर पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांनी सज्ज असतील.

आण्विक प्रतिबंधासाठी एक पाणबुडी नेहमी गस्तीवर असणे आवश्यक असते. देशाला किमान चार एसएसबीएनची गरज आहे. एखादी पाणबुडी बंदरात असताना, दुसरी गस्तीवर राहू शकते. आण्विक पाणबुडी अधिक काळ पाण्याखाली राहू शकतात. या पाणबुड्या देशाची आण्विक ट्रायड बळकट करतील. आण्विक प्रतिबंधन क्षमता वाढवून देशाच्या सुरक्षेत निर्णायक भूमिका निभावतील. पहिल्या आयएनएस अरिहंत पाणबुडीवर के-१५ या ७५० किमीवर मारा करणार्या क्षेपणास्त्रांची चाचणी झाली होती. भारताचे चीन किंवा पाकिस्तानशी अणुयुद्ध होईल का? याचा अंदाज कुठल्याही तज्ज्ञांना लावणे सोपे नाही. १९४५ नंतर अणुबॉम्बचा वापर कोठेच झाला नाही, तरीपण पाकिस्तान व चीनकडून वेळोवळी मिळणार्या धमक्यापासून रक्षण करण्याकरता अणुयुद्धाची तयारी करणे गरजेचे आहे.


आकाशातून अणुबॉम्ब टाकण्याकरिता आपल्या हवाईदलात सुखोई, मिराज अशी विमाने सुसज्ज आहेत. ही सध्याच्या गरजेसाठी पुरेशी आहेत. अणुबॉम्ब जमिनीवरून फायर करण्याकरिता वाहने पृथ्वी १, २, (३५० किमी), अग्नी १ आणि अग्नी २ (२००० किमी), अग्नी ३ (३००० किमी) शस्त्र म्हणून भारतीय सैन्यात सामील झालेले आहेत. अग्नी ४ (४००० किमी)ची मागच्या वर्षी टेस्ट करण्यात आली होती. जमिनीवरून फायर करण्याकरिता अग्नी ५ च्या रूपाने (५००० किमी) शस्त्र म्हणून सैन्यात येण्याकरिता अजूनसुद्धा १-२ वर्षे लागू शकतात.

लष्करी आणि सुरक्षा क्षेत्रात पाकिस्तान भारतासोबत चीनच्या मदतीने 'समानता' विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहे. १९९८ च्या भारताच्या आण्विक चाचण्यांनंतर पाकिस्ताननेही आण्विक चाचण्या घेतल्या. चीन पाकिस्तानच्या दोन आण्विक भट्ट्यांना मदत करत आहे. के-४ने सुसज्ज आयएनएस अरिघातच्या चाचणीने भारताची आण्विक प्रतिकारशक्ती पूर्णपणे कार्यान्वित होत असली, तरी आण्विक पाणबुडीला मुख्यालयाशी तत्काळ संवाद साधता येईल, यासाठी प्रभावी प्रणाली उभारण्यासाठी काम करावे लागणार

# आल्यापेक्षाही शक्तिशाली आहेत पेरूची पाने, डायबिटीस-कोलेस्ट्रॉलचे देशी औषध; कसे कराल सेवन

सध्या थंडीचा हंगाम असून या दिवसात पेरूचे भरपूर उत्पादन होते. पेरू खाण्याचे असंख्य आरोग्य फायदे आहेत. पण तुम्हाला माहित आहे का पेरूची पाने देखील खूप फायदेशीर असतात. तुम्हाला फक्त पेरूची पाने कशी वापरायची हे माहित असणे आवश्यक आहे. पेरूच्या पानांमध्ये शरीरासाठी अनेक आवश्यक पोषक घटक असतात आणि याच्या सेवनाने पचनक्रिया चांगली राहणे, रक्तातील साखर नियंत्रित ठेवणे, हृदय निरोगी ठेवणे आणि रोगप्रतिकार शक्ती मजबूत करणे यासारखे अनेक फायदे मिळतात.





ठाण्यातील आयुर्वेदिक क्लिनिक 'कामधेनू'मधील आयुर्वेदिक डॉक्टर माधव भागवत यांच्या म्हणण्यानुसार, जर तुम्हाला हिवाळ्यात आलं खाण्याचं वेड असेल तर आता तुम्ही पेरूच्या पानांचा चहा वापरून पहा. यामुळे तुमची चव आणि आरोग्य दोन्ही चांगले राहू शकते, जाणून घ्या अधिक माहिती

पचनक्रिया करते उत्तम

पेरूची पाने त्यांच्या अँटीबॅक्टीरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांमुळे पाचन समस्यांपासून मुक्त होण्यास मदत करतात. ही पाने हानिकारक जीवाणू (ई. कोलाय) प्रतिबंधित करतात आणि अतिसारापासून बरे होण्यास मदत करतात. त्यामध्ये असलेल्या फायबरमुळे आतड्याची हालचाल वाढते आणि आतड्यांचे आरोग्य सुधारते. पेरूच्या पानांचा चहा सूज आणि पेटके कमी करण्यास मदत करतो. पेरूची पाने पाण्यात उकळून चहा बनवा आणि दिवसातून १-२ वेळा प्या. पोटाच्या समस्यांपासून आराम मिळण्यासाठी पेरूची ताजी पाने चघळून खा

डायबिटीस रुग्णांसाठी उत्तम

पेरूची पाने रक्तातील साखर कमी करू शकतात, जी मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहे. हे आतड्यांमधील ग्लुकोजचे शोषण कमी करणारे एन्झाइम्स प्रतिबंधित करतात. पेरूच्या पानांचा चहा बनवा आणि जेवणानंतर प्या. ही एक आयुर्वेदिक पद्धत असून नैसर्गिकरित्या शरीरातील साखरेचे प्रमाण कमी करण्याचे आणि डायबिटीस नियंत्रित ठेवण्यासाठी उत्तम ठरते

वजनही होते कमी

पेरूची पाने गुंतागुंतीच्या कार्ब्सचे साखरेत रूपांतरित होण्यास प्रतिबंध करतात आणि चरबीचे संचय कमी करतात. त्यांचे अँटिऑक्सिडंट लठ्ठपणाशी संबंधित जळजळ कमी करतात. जेवणापूर्वी पेरूच्या पानांचा चहा प्या. यामुळे तुमच्या शरीरावरील चरबी लवकरात लवकर कमी करण्यास मदत मिळते आणि तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर नक्कीच पेरूच्या पानांचा चांगला उपयोग करून घेता येऊ शकतो. आयुर्वेदात याबाबत अधिक चांगले उपयोग सांगण्यात आले आहेत.

कोलेस्ट्रॉल नियंत्रणासाठी

पेरूच्या पानांमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स आणि पोटॅशियम खराब कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइड्स कमी करतात, तर चांगले कोलेस्ट्रॉल वाढवतात. पेरूच्या पानांचा चहा नियमित सेवन केल्याने शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल त्वरीत कमी होण्यास मदत मिळते. कोलेस्ट्रॉल वाढल्यास त्याचा प्रत्यक्ष परिणाम हा हृदयावर होत असतो. त्यामुळे पेरूच्या पानांचा चहा पिण्याने हृदय चांगले राहण्यासही मदत मिळते.

याशिवाय पेरूच्या पानांमध्ये व्हिटॅमिन सी आणि फ्लेव्होनॉइड्स असतात, जे रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आणि संक्रमणापासून संरक्षण करतात. ऋतूतील बदलांमध्ये पेरूच्या पानांचा चहा पिणे नक्कीच फायदेशीर ठरू शकते.

पेरूच्या पानांचे अन्य फायदे

पेरूच्या पानाच्या सेवनाने त्वचेचे आरोग्य सुधारते

केसांच्या समस्यांपासून आराम मिळतो

त्याचे अँटीइन्फ्लेमेटरी गुणधर्म वेदना आणि सूज कमी करतात

हिरड्यांचे आजार, दातदुखी आणि श्वासाची दुर्गंधी यांच्याशी लढण्यास पेरूची पाने मदत करतात

पेरूच्या पानांमध्ये असलेले फ्लेव्होनॉइड्स आणि अँटीऑक्सिडंट्स कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखू शकतात

# शिंदेंच्या संभाव्य १२ मंत्र्यांची यादी समोर, बड्या नेत्यांना डच्चू; नव्या चेहऱ्यांना संधी

देवेंद्र फडणवीस ३.० सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार शनिवारी होण्याची शक्यता आहे. राज्यपालभवन येथे नव्या मंत्र्यांच शपथविधी सोहळा पार पडणार आहे. मात्र, महायुतीतील कुठल्या पक्षाला किती खाती मिळणार?

कुठली खाती मिळणार? यावरून धाकधूक वाढली आहे. यातच शिंदेंच्या शिवसेनेतून कुणाला संधी मिळणार? याची नावे समोर आली आहे.

एका मराठी वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार, शिंदेंच्या शिवसेनेच्या ९ मंत्रिपदे आणि ३ राज्यमंत्रिपदे मिळणार आहे. ही यादी जवळपास निश्चित मानली जात आहे. पण, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना जे आमदार मंत्री होते, त्यातील काही जणांना वगळून नव्यांना संधी देण्यात आली आहे.

संभाव्य मंत्र्यांच्या यादीत भरत गोगावले आणि संजय शिरसाट यांचा समावेश आहे. भरत गोगावले यांना विरोध मंत्रिपदाच्या शपथविधीला कोट कधी घालणार? म्हणून डिवचत असत. पण, यंदा गोगावले यांची कोट घालण्याची इच्छा पूर्ण होणार आहे. अडीच वर्षांच्या कार्यकाळात शेवटच्या मंत्रिमंडळ विस्तापर्यंत दोघांना मंत्रिपदाची अपेक्षा होती. पण, अपेक्षा पूर्ण न झाल्यानं अखेरच्या क्षणी गोगावले यांना राज्य परिवहन महामंडळाचे आणि सिरसाट यांना सिडकोचे अध्यक्षपद दिले होते.त्याशिवाय आमदार प्रताप सरनाईक आणि आमदार विजय शिवतारे यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते.

शिवसेनेचे संभाव्य कॅबिनेट मंत्री

एकनाथ शिंदे, उदय सामंत, शंभुराज देसाई, दादा भुसे, प्रताप सरनाईक, संजय शिरसाट, गुलाबराव पाटील, भरत गोगावले

शिवसेनेचे संभाव्य राज्यमंत्री

योगेश कदम, विजय शिवतारे, राजेंद्र पाटील यड्रावरकर अथवा प्रकाश आबिटकर

कुणाला मिळणार डच्चू?

# घेऊन येत आहे चालते-फिरते ७ आता लग्झरी सुविधांमुळे प्रवास होईल अधिक आरामदायी

प्रवास प्रेमींसाठी आनंदाची बातमी! भारतीय रेल्वे आणि खठउढउ आणत आहेत चालते-फिरते ७-स्टार हॉटेल! शाही थाटाने सुसज्ज तुमची प्रत्येक रॉयल इच्छा आता ट्रेनमध्ये पूर्ण होणार. प्रवास करता करता आता तुम्ही लग्झरी गोष्टींचा आनंद उचलू शकता. होय, तुम्ही बरोबर वाचले! तुम्हाला स्पामध्ये स्वतःला ताजेतवाने करायचे असले, जिममध्ये घाम गाळायचा असेल किंवा बारमध्ये बसून वाईन आणि बिअरचा आनंद लुटायचा असेल, आता या सर्वच गोष्टी तुम्हाला कोणत्या हॉटेलमध्ये नाही तर भारतीय रेल्वेमध्ये अनुभवता येणार आहेत. आम्ही तुम्हाला सांगतो, डिसेंबर ते मार्च या वेगवेगळ्या तारखांना धावणाऱ्या या ट्रेनचे बुकिंग आता सुरू करण्यात आले आहे. चला या ट्रेनविषयी सविस्तर माहिती जाणून घेऊयात. कर्नाटकच्या रॉयल ट्रेनमध्ये प्रत्येक सुविधा या रॉयल ट्रेनमध्ये १३ डबल बेड केबिन, २६ ट्विन बेड केबिन आणि एक विशेष दिव्यांग केबिन आहे. प्रत्येक केबिनमध्ये एयर कंडीशनिंग, वाय-फाय, उत्तम फर्निचर आणि लग्झरी बाथरूम आहेत. याशिवाय, एक सलून देखील आहे जिथे तुम्ही स्वतःला ग्रूम करू शकता. पाच रात्र आणि सहा दिवसांच्या या प्रवासात तुम्हाला कर्नाटकची संस्कृती, इतिहास आणि नैसर्गिक सौंदर्य अनुभवता येईल.

# नाश्त्यासाठी पदार्थ शोधताय? मग सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवून पहा रव्याचा उत्तपम

भारतासह जगभरात सगळीकडे साऊथ इंडियन पदार्थ मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध आहेत. साऊथ इंडियन पदार्थांमध्ये इडली, डोसा, मेदुवडा, आप्पे, रसम, उत्तपम इत्यादी अनेक पदार्थ खाल्ले जातात. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं हे पदार्थ खूप आवडतात. सकाळच्या किंवा संध्याकाळच्या नाश्त्यात प्रामुख्याने दक्षिण भारतीय पदार्थ बनवले जातात. तांदूळ आणि उडीद डाळीचा वापर करून बनवलेले डोसे खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा होते. अशावेळी तुम्ही रव्याचे उत्तपम बनवू शकता. रव्याचे उत्तपम बनवण्यासाठी अतिशय सोपे आहे. कमीत कमी वेळात झटपट रव्याचे उत्तपम तयार होते. तांदूळ आणि उडीद डाळीच्या पिठापासून उत्तपम बनवण्यासाठी जास्त वेळ लागतो. मात्र कमीत कमी वेळात जर तुम्हाला उत्तपम बनवण्याचे असेल तर तुम्ही रव्याचे उत्तपम बनवू शकता. चला तर जणू घेऊया रव्याचे उत्तपम बनवण्याची सोपी रेसिपी.



साहित्य:

रवा
दही
कांदा
कोथिंबीर
टोमॅटो
मीठ
तेल
हिरवी मिरची
गाजर
काळीमिरी पावडर
जिरे पावडर
शिमला मिरची

कृती:

रव्याचे उत्तपम बनवण्यासाठी सर्वप्रथम, रवा स्वच्छ साफ करून घ्या. त्यानंतर वाटीमध्ये स्वच्छ केलेला रवा, दही आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करून घ्या.


बाऊलमध्ये सर्व बारीक करून घेतलेल्या भाज्या. काळीमिरी पावडर, चवीनुसार मीठ, कोथिंबीर, बारीक चिरून घेतलेली हिरवी मिरची घालून व्यवस्थित मिक्स करा.

पॅन गरम करायला ठेवून पॅनवर थोडेसे तेल टाकून पसरवून घ्या. नंतर त्यावर उत्तपम साठी रव्याचे मिश्रण टाकून त्यावर सर्व भाज्या टाका. भाज्यांना वाफ आल्यानंतर उत्तपम उलटा करून दोन्ही बाजूने व्यवस्थित भाजून वरून तूप किंवा चीझ टाकून सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला रवा उत्तपम.

# लहान मुलांच्या 'या' सवयी पडू शकतात महागात; पालकांनो, वेळीच सावध व्हा!

लहान मुलांमध्ये मोबाईल फोनची सवय फार पाहायला मिळते. बहुतेक मुलांना या सवयी लागतात आणि त्या वाढत जातात. काही लहान बाळ अशी आहेत ज्यांना जेवताना हातात मोबाईल फोन लागतोच. त्याशिवाय घशाखाली जेवण जात नाही. जर तुमच्याही घरामध्ये असा बाळ आहे, ज्याच्या हातात नुसता मोबाईल फोन असतो तर जरा सांभाळून राहा. कारण याने बाळाच्या आरोग्यावर आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो.



लठ्ठपणा

जेवताना जर बाळ किंवा लहान मुलं हातात मोबाईल फोन घेऊन असेल तर लठ्ठपणाचा आजार होतो. कारण अशा स्थितीत मुलांचे खाण्यावर काही लक्ष नसते. मुले चावण्या व्यतिरिक्त अन्न गिळतात. ज्याने ते अंगाला लागत नाही आणि लठ्ठपणा किंवा कुपोषित होणे असे समस्या दिसून येतात.

पचनात अडथळा

खाताना खाण्यावर लक्ष न देता पूर्णपणे मोबाईल फोनच्या स्वाधीन जाणे कठीण ठरते. याने पचनाची समस्या उद्भवते. पोट दुखणं याची शक्यता असते. तसेच गॅस तयार होणे आणि इतर पचनासंबंधित समस्या उद्भवतात.

मानसिक समस्या

अन्न शरीराला लागणार नाही तर त्याचा नक्कीच मानसिक आरोग्यावर परिणाम जाणवणार. मानसिक त्रास होणार. लहान मुलांमध्ये कमी वयात स्ट्रेस तसेच डिप्रेशनसारख्या गोष्टी दिसून येतात. हार्मोन लेव्हल बिघडू शकतात, ज्याने मानसिक ग्रोथ नाही होत.

डोळ्यांचे आरोग्य

लहान मुलांमध्ये डोळ्यांचा चष्मा लागण्याचे प्रमाण फार आहे. याला कारणीभूत मोबाईल फोनचा अतिवापर आहे. जास्त स्क्रिनटाईममुले डोळ्यांचे आरोग्य तर खराब होतेच परंतु, अगदी कमी वयात पाहण्यासाठी आधार घ्यावा लागतो. दृष्टी कमकुवत होत जाते.

शारीरिक आणि सामाजिक आरोग्य

दिवसरात्र मोबाईल फोनच्या स्वाधीन गेल्याने मुलांना इतर गोष्टीत रस नाही लागत. मैदानी खेळापासून लांब राहिल्याने शारीरिक वाढ होण्यास अडथळा येतो. तसेच ज्या वयात मित्रांचा सहवास लाभणे गरजेचे असते, त्या गोष्टींपासून मुलगा दूर राहतो. एकंदरीत, लहान मुले एकल बनतात.

काय करावे, काय करू नये

पालकांनी जेवणाच्या वेळी मुलांना फोन देऊ नये. जर आधीच ही सवय लागली असेल तर ती हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न करावा.

मुलांना फोन वापरण्याचे तोटे समजावून सांगावेत.

जर मुले खूपच लहान असतील, तर त्यांना स्वतः खाऊ घालावे.

मुलांच्या या सवयीपासून मुक्त होण्यासाठी काउंसिलिंगचा पर्याय देखील वापरू शकता.

# हिवाळ्यामध्ये सतत सतत डोकं दुखत? मग 'या' चहाचे सेवन करून मिळवा आराम, उद्भवणार नाही डोकेदुखीची समस्या

राज्यभरात सगळीकडे थंडी वाढल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. थंडीच्या दिवसांमध्ये आरोग्याची जास्त काळजी घेणे गरजेचे आहे. कारण या दिवसांमध्ये साथीचे आजार मोठ्या प्रमाणावर सगळीकडे पसरू लागतात. सतत सर्दी, खोकला किंवा ताप वाढू लागल्यामुळे आरोग्य बिघडून जाते. थंडीच्या दिवसांमध्ये आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. त्यात प्रामुख्याने उद्भवणारी समस्या म्हणजे सतत डोकं दुखणे. डोकं दुखण्यास सुरुवात झाल्यानंतर काय करावे हे अनेकदा सुचत नाही. वातावरणात सतत होणाऱ्या बदलांमुळे तीव्र डोके दुखी होण्यास सुरुवात होते. अशावेळी अनेक लोक पेनकिलरच्या गोळ्या घेतात. पण सतत पेनकिलरच्या गोळ्या खाणे आरोग्यासाठी घातक आहे.





डोके दुखीची समस्या उद्भवल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करणे आवश्यक आहे. तसेच डोकं दुखण्यास सुरुवात झाल्यानंतर पेनकिलरच्या गोळ्या घेण्याऐवजी घरगुती उपाय करून पाहावे, यामुळे लवकर आराम मिळतो. हिवाळ्यात डोकं दुखण्यास सुरुवात झाल्यानंतर चहाचे सेवन करावे. चहा प्यायल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. आलं, वेलची, लवंग, दालचिनी इत्यादी मसाल्यांचा वापर करून बनवलेला चहा आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहे. या चहामध्ये असलेले दाहक विरोधी गुणधर्म आरोग्य सुधारण्यास मदत करतात.

चहा बनवण्याची कृती:

थंडीच्या दिवसांमध्ये डोकं दुखीची समस्या उद्भवू लागल्यास मसाल्याच्या चहाचे सेवन करावे. यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होईल. डोकं दुखी दूर करण्यासाठी चहा बनवताना त्यात तुळशीची पाने, लवंग आणि काळी मिरी घालून चहा तयार करावा. या मसाल्यांमध्ये असलेले गुणधर्म डोके दुखीच्या समस्येपासून आराम मिळवून देण्यास मदत करतात. घसा दुखणे, सर्दी खोकला इत्यादी समस्यांपासून आराम मिळवून देण्यास मसाल्याचा चहा मदत करतो.

गूळ आणि लवंगचा चहा बनवण्याची कृती:

हिवाळ्यामध्ये डोकं दुखीची समस्या उद्भवू लागल्यास लवंग आणि गुळाच्या चहाचे सेवन करावे. यामुळे तात्काळ डोके दुखीपासून आराम मिळतो. शरीरातील उबदारपणा कायम टिकवून ठेवण्यासाठी लवंग गुळाचे सेवन करावे. या चहामध्ये असलेले अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म त्वचेला संसर्ग आणि जळजळ होण्यापासून बचाव करतात. त्वचेची गुणवत्ता सुधारण्यासाठी गूळ लवंगचा चहाचे सेवन करावे.

सर्दी खोकल्यापासून आराम:

थंडीच्या दिवसांमध्ये सर्दी, खोकला, ताप इत्यादी समस्या सतत उद्भवतात. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी मसाल्याच्या चहाचे सेवन करावे. हा चहा बनवताना साखरेचा वापर करण्याऐवजी गुळाच्या चहाचे सेवन करावे. ज्यामुळे आरोग्याला फायदे होतील. गुळाच्या चहामध्ये असलेली लवंग, दालचिनी, आलं, तुळस आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहेत. यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स सर्दी, खोकला, ताप आणि साथीच्या आजारांपासून बचाव करण्यास मदत करतात.

# पांढरे केस एका रात्रीत होतील काळे, फक्त १० रुपयांत तयार करा नॅचरल हेअर पॅक

आजकाल केस पांढरे होणे एक सामान्य समस्या बनली आहे. आता वयात नसणाऱ्यांचेही केस लगेच पांढरे पडतात, ज्यामुळे बहुतेक सर्वांनाच पांढऱ्या केसांची समस्या भेडसावत आहे. याचे मूळ कारण धाकधुकीचे जीवन, चुकीची जीवनशैली, ताणतणाव, चुकीचा आहार तसेच केमिकल्सने भरलेल्या उत्पादनांचा वापर असू शकतो. बाजारातील हेअर कलर हे तात्पुरते केस काळे करतात मात्र याचे परिणाम केसांवर दीर्घकाळ टिकून राहतात, जे केसांसाठी हानिकारक ठरू शकते.

आम्ही तुम्हाला सांगतो की, तुमचे काळे केस केमिकलयुक्त हेअर कलर्सने कलर करण्याऐवजी तुम्ही घरीच केसांसाठी एक नैसर्गिक आणि प्रभावी असा हेअर पॅक तयार करू शकता. हा हेअर पॅक फार स्वस्तात बनून तयार होतो आणि यामुळे तुमचे केस नॅचरली काळे होतात. हा एक नैसर्गिक पॅक असल्याने याचा तुमच्या केसांवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. आज आपण या लेखात पांढऱ्या केसांना काळे करण्यासाठी दहापासून कशाप्रकारे वेगवगेळे हेअर पॅक तयार केले जाऊ शकतात हे जाणून घेणार आहोत.दही-मेथीचा पॅक केसांसाठी दही आणि मेथीच्या पावडरचे मिश्रण केसांसाठी एक प्रभावी उपाय आहे. ही पेस्ट केसांना पोषण देण्यसाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकते. मेथीमध्ये लोह आणि प्रथिने मुबलक प्रमाणात असल्याने हे केसांच्या मुलांपर्यंत पोषण पोहचवण्यास मदत करते. या पेस्टच्या वापराने केसांची गळती कमी होते आणि केसांचा रंग हळूहळू गडद होऊ लागतो. आठवड्यातून किमान दोन दोनदा तुम्ही याचा वापर करू शकता.दही-आवळा पॅक आवळा केसांसाठी एक रामबाण उपाय मानला जातो. आवळा पावडर दह्यात मिसळून तुम्ही याची पेस्ट तयार करू शकता आणि मग ही पेस्ट केसांना लावू शकता. हे मिश्रण केसांना मजबूत करण्यास मदत करते.

